# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.12.2025** **वारःमंगळवार**

---

•राज्यातल्या 29 महापालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान; १६ जानेवारीला मजमोजणी

•राज्यात बहुतांश ठिकाणी महायुती; तर पुण्यात मैत्रीपूर्ण लढत होईल – मुख्यमंत्र्यांची माहिती

•मतदार याद्यांविषयी हरकती नोंदवूनही निवडणूका जाहीर केल्याबद्दल विरोधी पक्षांची नाराजी

•आणि

•पंतप्रधान नरेंद्र मोदी जॉर्डनच्या दौऱ्यावर; भारत-जॉर्डन व्यापार संमेलनाला आज संबोधित करणार

**<u>महापालिकानिवडणूक</u>**

बृहन्मुंबई, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेसह राज्यातल्या 29 महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचं वेळापत्रक राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. त्यानुसार राज्यातील सर्व २९ महापालिकांसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मजमोजणी होणार आहे. या सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये कालपासून आचारसंहिता लागू झाली आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून

*<u>स्क्रिप्ट</u>*

*राज्यातल्या 29 महापालिकांच्या निवडणुकीसाठीची अधिसूचना गुरुवारी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर येत्या २३ ते ३० डिसेंबरपर्यंत केवळ ऑफलाइन पद्धतीनं उमेदवारी अर्ज भरता येतील. अर्जनची छाननी ३१ डिसेंबरला होईल, २ जानेवारीपर्यंत अर्ज माघारी घेता येतील आणि ३ जानेवारीला अंतिम उमेदवार यादीसह चिन्हवाटप होईल. १५ जानेवारी रोजी मतदान तर १६ जानेवारीला मतमोजणी होईल.*

*मुंबई वगळता इतरत्र बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनं निवडणूक होईल; एका प्रभागात जितके सदस्य असतील तितकी मतं मतदारांना द्यावी लागतील. हे मतदान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर म्हणजे EVM वर होणार आहे, मात्र तांत्रिक समस्येमुळं व्हीव्हीपॅटचा वापर या निवडणुकांमध्ये होणार नाही, असं दिनेश वाघमारे यांनी सांगितलं.*

*मतदार यादीमधील संभाव्य दुबार मतदारांची ओळख केलेली आहे आणि संभाव्य दुबार मतदार यांच्या नावासमोर डबल स्टार असं त्यावर मार्क करण्यात आलेला आहे आणि संभाव्य दुबार मतदारांच्या संदर्भात जी प्रक्रिया आहे की संभाव्य दुबार मतदारांमध्ये महापालिका आयुक्तांच्या मार्फत संभाष दुबार मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण केलेलं आहे आणि त्यामध्ये दुबार मतदारांना विचारून तो कुठल्या मतदान केंद्रावर मत देईल यासंदर्भात त्याच्याकडून लिहून घेण्यात आलेलं आहे आणि त्या मतदान केंद्राच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मतदान केंद्रावर त्याला मतदान करू दिलं जाणार नाही*

*राज्यभरातल्या २९ महापालिकांमधल्या एकंदर 893 प्रभागतील २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहेत. त्यापैकी १ हजार ४४२ जागा महिलांसाठी, ३४१ जागा अनुसूचित जातींसाठी आणि ७७ जागा अनुसूचित जमातींसाठी तर 759 जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित आहेत.*

*या निवडणुकीत ३ कोटी ४८ लाखांहून अधिक मतदार असून त्यांच्यासाठी ३९ हजार १४७ मतदान केंद्रं कार्यरत असतील.*

*मतदार यादीतील मतदाराचं नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयी माहिती जाणून घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'मताधिकार' हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिलं आहे. तसंच mahasecvoterlist.in हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करून देण्यात आलं आहे.*

१ जुलै २०२५ रोजी विधानसभा निवडणुकीच्या मतदारयादीत नाव असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात मतदान करता येईल, या याद्यांतील नावं वगळण्याचा किंवा नव्याने नावे समाविष्ट करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही; परंतु त्यातील दुबार नावांबाबत मात्र राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केला आहे, असं दिनेश वाघमारे यांनी सांगितलं, ते म्हणाले------

**Intro**

**<u>मुख्यमंत्री-पुणे</u>**

महायुती सरकारनं राज्यात केलेलं काम पाहता जनता या निवडणुकीत महायुतीलाच कौल देईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते काल पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आले आणि काँग्रेस त्यांच्यासोबत गेली तरीही आपल्याला कोणताही फटका बसणार नाही, मुंबईकर महायुतीलाच निवडून देतील, असंही ते म्हणाले.

महानगरपालिका निवडणुकांमध्ये राज्यात बहुतांश ठिकाणी महायुती म्हणून लढू, पुण्यात मात्र भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी मैत्रिपूर्ण लढत होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले-----

***आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करतो. जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती होईल. काही ठिकाणी भाजप शिवसेना राष्ट्रवादी युती होईल. एखाद दोन ठिकाणी भाजप राष्ट्रवादी युती देखील होताना आपल्याला पाहायला मिळेल. आता तुम्ही पुण्यामध्ये मला विचारालच म्हणून सांगतो. पुण्यामध्ये मात्र अजित दादांची आमची चर्चा झालेली आहे. आम्ही दोघेही इथले मोठे पक्ष आहोत. भाजपने पाच वर्षात चांगल्या पद्धतीनं पुण्याचा विकास केलेला आहे. त्यामुळे कदाचित पुण्यामध्ये, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी अमोरासमोर लढताना त्या ठिकाणी पाहायला मिळतील. पण असं असलं तरीही मैत्रीपूर्ण लढत असेल याच्यामध्ये कुठेही कटुता नसेल.***

**<u>सपकाळ</u>**

निवडणूक आयोगाने निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली असली तरी निवडणूक याद्या, दुबार मतदार आणि प्रभाग रचनेबाबत आमच्या पक्षाने महत्वाच्या पुराव्यासह, आक्षेप आणि हरकती नोंदवल्या होत्या, मात्र, त्यावर आयोगाने काहीच कारवाई केली नाही असे आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहेत. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

सांगली, मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी, पुढील दोन-तीन दिवसात जागा वाटपाबाबत चर्चा करण्यात येईल असं, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी काल सांगलीत सांगितलं. महापालिका निवडणुकींच्या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**<u>पंतप्रधान-दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात काल ते जॉर्डनची राजधानी अम्मानला पोहोचले. जॉर्डनचे पंतप्रधान आणि राजे अब्दुल्ला द्वितीय इब्न अल हुसेन

यांनी त्यांचं स्वागत केलं. पंतप्रधानांनी काल अम्मानमधील भारतीय समुदायाशी संवाद साधला. आज पंतप्रधान, भारत-जॉर्डन व्यापार संमेलनाला संबोधित करणार आहेत. पंतप्रधान मोदी उद्या इथिओपियाची राजधानी अदिस अबाबाला जाणार असून, दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, बुधवारी ते ओमानची राजधानी मस्कतला भेट देतील.

**<u>संसदकामकाज</u>**

काँग्रेसच्या नवी दिल्लीत झालेल्या रॅलीमध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सदस्यांनी काल संसदेत केला. या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेस नेतृत्वाने माफी मागावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत तर जे. पी. नड्डा यांनी राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित केला. यावरून झालेल्या गदरोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज काही वेळ तहकूब करण्यात आलं.

कामकाज सुरू झाल्यावर लोकसभेत कायदा रद्द करणं आणि दुरुस्ती विधेयक, अणुउर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक तसंच विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक सादर झालं. शिक्षा विधेयकातून UGC, AICTE आणि NCTE चं एकत्रीकरण होणार आहे. हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय लोकसभेनं घेतला.

**<u>विजयदिवस-</u>**

१९७१मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या युद्धाच्या ऐतिहासिक विजयाची आठवण जपणारा विजय दिन आज देशभरात साजरा केला जात आहे. विजय दिनाच्या पूर्वसंध्येला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये वीर जवानांच्या शौर्याचं स्मरण करत त्यांना मानवंदना अर्पण करण्यात आली. राष्ट्रीय छात्रसेना, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात अहिल्यानगरच्या मेकॅनाईज इन्फंट्री आणि द बॉम्बे सॅपर्स’नं बँड सादर केला.

**<u>मुख्यमंत्री</u>**

पुणे महापालिका आणि महा मेट्रोच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. पुणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कोंढवा बुद्रुक इथं उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचं लोकार्पणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल करण्यात आलं. मुख्यमंत्र्यांनी काल पुणे पुस्तक महोत्सवालाही भेट दिली.

**<u>मुख्यमंत्री</u>**

सांगलीत उभारण्यात आलेल्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं तसंच इचलकरंजीमध्ये उभारण्यात आलेल्या, छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळयाचं लोकार्पणही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**<u>नाशिक-सिंहस्थ-वृक्षारोपण</u>**

पुढील वर्षी नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ‘हरीत कुंभ’ साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी नाशिक परिसरात १५ हजार रोपं लावून वनराई फुलवण्यात येणार आहे. या उपक्रमाचा प्रारंभ कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते काल झाला.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा कडाका कायम आहे. अनेक ठिकाणी पारा दहा अंशांच्या खाली घसरला असून काल अहिल्यानगर इथ सर्वात कमी 8 पूर्णांक 3 दशांश अंश इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याच्या अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**